# भारताचा मालिका विजय

## शुभमन गिलच्या नाबाद शतकी खेळीमुळे न्यूझीलंडवर १६८ धावांनी मात

**पीटीआय, अहमदाबाद**

**शुभमन गिलच्या** (६३ चेंडूंत नाबाद १२६ धावा) शतकानंतर हार्दिक पंड्याने (१६ धावांत ४ बळी) केलेल्या भेदक गोलंदाजीच्या बळावर भारताने तिसऱ्या आणि अखेरच्या ट्वेन्टी-२० सामन्यात न्यूझीलंडवर १६८ धावांनी विजय मिळवत मालिका २-१ अशी जिंकली. या मालिका विजयासह भारताने मायदेशातील वर्चस्वही कायम राखले.

भारत-न्यूझीलंड ट्वेन्टी-२० मालिका

नाणेफेक जिंकून भारताने प्रथम फलंदाज करताना मुक्तपणे फटकेबाजी केली. यातही शुभमन गिलचा तडाखा जबरदस्त होता. गिलने आपल्या खेळीत १२ चौकार व ७ षटकार लगावले. भारताने निर्धारित २० षटकांत ४ बाद २३४ धावांचा डोंगर उभा केला. आव्हानाचा पाठलाग करताना न्यूझीलंडचा डाव ७३ चेंडूंतच अवघ्या ६६ धावांत आटोपला. कर्णधार पंड्याने न्यूझीलंडला




रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याला पूरक साथ देताना शिवम मावीने संधीचे सोने केले. मावी, उमरान मलिक आणि अर्षदीप सिंगने प्रत्येकी दोन गडी बाद केले. न्यूझीलंडकडून डॅरेल मिचेल (३५) आणि मिचेल सँटनर (१३) वगळता एकही फलंदाज दोन आकडी मजल मारु शकला नाही.

तत्पूर्वी, सलामीचा फलंदाज शुभमन गिलच्या घणाघाती नाबाद शतकी खेळीने भारताचे आव्हान भक्कम उभे राहिले. जबरदस्त लयीत असलेल्या गिलने आपल्या भात्यातील सर्व फटक्यांचा मुक्त वापर करून न्यूझीलंडच्या गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले. अर्थात, भारताची सुरुवात फार काही चांगली नव्हती. प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतल्यावर भारतीय सलामीची जोडी अडखळली होती. न्यूझीलंड कर्णधार मिचेल सँटनेरने वेगळाच डाव खेळताना नवा चेंडू ऑफ स्पिनर मायकल ब्रेसवेलकडे सोपविला. ब्रेसवेलनेही कर्णधाराचा विश्वास सार्थ ठरविताना ईशान किशनचा अडथळा दूर केला. किशन बाद झाल्यावर मात्र भारतीय फलंदाजीचा वेगळाच नूर राहिला. राहुल त्रिपाठीने आक्रमण करायला सुरुवात केली. गिलनेही त्याला साथ दिली. त्रिपाठीच्या फटकेबाजीने न्यूझीलंडच्या गोलंदाजीची लय बिघडली. पण, षटकाराच्या मोहाने त्रिपाठी बाद झाला. सूर्यकुमार यादवही (१३ चेंडूंत २४) बाद झाला. सूर्यकुमार चांगल्या सुरुवातीनंतरही माघारी परतला.

त्या वेळी एकत्र आलेल्या गिल आणि हार्दिक पंड्या जोडीने १४व्या षटकापासून सुरु केलेल्या फटकेबाजीने न्यूझीलंडचे गोलंदाज हतबल झाले. ट्वेन्टी-२० कारकीर्दीतले पहिले शतक साजरे करत गिलने फर्ग्युसनचा समाचार घेतला. भारताकडून ट्वेन्टी-२० मधील १२६ धावांची सर्वोत्तम खेळी करताना गिलने अखेरपर्यंत नाबाद राहताना भारताचे आव्हान भक्कम केले. डॅरेल मिचेलने टाकलेले अखेरचे षटक वगळता न्यूझीलंडचे गोलंदाज गिलच्या फटकेबाजीपुढे हतबल झाले होते.

### संक्षिप्त धावफलक

**भारत** : २० षटकांत ४ बाद २३४ (शुभमन गिल नाबाद १२६, राहुल त्रिपाठी ४४, हार्दिक पंड्या ३०; सूर्यकुमार यादव २४, मायकल ब्रेसवेल १/८, ईश सोधी १/३४)

**विजयी वि. न्यूझीलंड** : १२.१ षटकांत सर्वबाद ६६ (डॅरेल मिचेल ३५, मिचेल सँटनर १३; हार्दिक पंड्या ४/१६, उमरान मलिक २/९, शिवम मावी २/१२, अर्शदीप सिंग २/१६)

## सचिन तेंडुलकरच्या हस्ते युवा महिला संघाचा सत्कार




**अहमदाबाद** : १९८३च्या विश्वचषक विजयानंतर माझ्यातील क्रिकेटविषयक स्वप्नाचा जन्म झाला. आता तुमच्या या विश्वविजयामुळे अनेक मुली क्रिकेटपटू होण्याचे स्वप्न पाहतील. तुमची ही कामगिरी नक्कीच दमदार आणि अनेक मुलींना क्रिकेट खेळण्यास प्रेरित करणारी आहे, अशा शब्दांत भारताचा दिग्गज क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने १९ वर्षांखालील विश्वविजयी युवा महिला संघाचे अभिनंदन केले. भारत-न्यूझीलंड सामन्यादरम्यान या विश्वविजयी संघाचा सचिनच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे अध्यक्ष रॉजर बिन्नी आणि सचिव जय शहा उपस्थित होते. महिला प्रीमियर लीगची सुरुवात करून भारतीय किकेट नियामक मंडळाने देशातील महिला क्रिकेटच्या प्रगल्भतेच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे, असेही सचिन म्हणाला.

# महाराष्ट्राला पहिले सुवर्ण

## टेबल टेनिसमध्ये पृथा वर्टिकर, जेनिफर वर्गिसची दुहेरीत सोनेरी कामगिरी

**भोपाळ :** दोन वेळा खेलो इंडिया युवा स्पर्धेत विजेते राहिलेल्या महाराष्ट्राची चौथ्या पर्वातील पदकांची सुरुवात टेबल टेनिसपटूंनी करून दिली. मुलींच्या दुहेरीत पृथा वर्टिकर आणि जेनिफर वर्गिसने सोनेरी यश मिळविताना आपल्याच संघ सहकारी जोडीचा पराभव केला. युवा जागतिक विजेती बॉक्सिंगपटू देविका घोरपडेनेही उपांत्य फेरी गाठताना आपले पदक निश्चित केले. नेमबाजी, योगासन यातील खेळाडूंनी पात्रता फेरीतून चमकदार कामगिरी करताना अंतिम फेरीत प्रवेश केला.

खेलो इंडिया क्रीडा स्पर्धा

टेबल टेनिसमध्ये पृथा वर्टिकर व जेनिफर वर्गिस यांनी दुहेरीत सुवर्णकमाई करताना महाराष्ट्राच्याच तनिषा कोटेचा-रिशा मिरचंदानी जोडीचा १३-११, ११-९, ११-७ असा पराभव केला. मुलांच्या गटात जश मोदी व नील मुळ्ये यांनी पश्चिम बंगालच्या अंकुर भट्टाचार्य व सौम्यदीप सरकार जोडीचा ११-६, ११-५, ११-८ असा पराभव करून महाराष्ट्राला कांस्यपदक मिळवून दिले. विजेतपदाचा आनंद निश्चित आहे. पण, अंतिम फेरीत महाराष्ट्राच्याच



खेळाडूंशी खेळावे लागेल असे वाटले नव्हते, अशी प्रतिक्रिया पृथा-जेनिफरने व्यक्त केली.

**खो-खोमध्ये दोन्ही संघ उपांत्य फेरीत**

महाराष्ट्राच्या मुले-मुलींच्या संघांनी आपले निर्विवाद वर्चस्व राखत सलग चौथ्यांदा खो-खो क्रीडा प्रकारात उपांत्य फेरी गाठली. दीपाली, अश्विनीच्या चमकदार खेळाच्या जोरावर मुलींनी पंजाबचा १ डाव ४ गुणांनी पराभव केला. पहिल्याच डावात पंजाबचे १४ गडी टिपत महाराष्ट्राच्या मुलींनी विजय निश्चित केला. महाराष्ट्राच्या मुलांनी किरण वसावे, सचिन पवार यांच्या सुरेख खेळाच्या जोरावर पश्चिम बंगालचा चुरशीच्या लढतीत ७ गुणांनी पराभव केला.

**देविका उपांत्य फेरीत**

बॉक्सिंगमधील युवा जागतिक विजेत्या महाराष्ट्राच्या देविका घोरपडेने उपांत्य फेरी गाठताना ५२ किलो गटात हरयाणाच्या अंजली कुमारीचा एकतर्फी लढतीत पराभव करताना पंचांकडून ५-० असा कौल मिळविला. मुलांच्या गटात अभिषेकने (७५ किलो) अरुणाचल प्रदेशच्या रिंचन देपकाचा पराभव केला.

**बॅडमिंटनमध्ये नाईशा उपांत्य फेरीत**

आंतरराष्ट्रीय क्रमवारीत ८३ व्या स्थानावर असलेल्या १४ वर्षीय बॅडमिंटनपटू नाईशा कौरने बॅडमिंटन एकेरीत उपांत्य फेरी गाठली. दुसऱ्या फेरीत नाईशाने दुसऱ्या मानांकित खेळाडू नाईसा करियप्पाचा पिछाडीवरून १७-२१, २१-१८, २१-१३ असा पराभव केला.

**योगासन प्रकारात आगेकूच**

योगासन स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पारंपरिक आणि कलात्मक प्रकारातून अंतिम फेरी गाठली. १८ वर्षांखालील (पारंपरिक) मुलींमध्ये रुद्रांशी भावे , निरल वाडेकर, तृप्ती डोंगरे, स्वरा गुजर तर, मुलांमध्ये निबोध पाटील, अंश मयेकर, स्वराज फिस्के, अरविंद साबावत यांनी आगेकूच केली. १८ वर्षांखालील कलात्मक प्रकारात मुलींमध्ये निरल वाडेकर, वैदेहीड मयेकर, तन्वी रेडीज तर, मुलांमध्ये सुमित बंडाले, स्वराज फिस्के, प्रीत बोरकर यांनी पुढची फेरी गाठली.

# क्रीडा क्षेत्रासाठी ७०० कोटींहून अधिक रुपयांची वाढ

**नवी दिल्ली** : आशियाई क्रीडा स्पर्धेचे वर्ष आणि २०२४च्या ऑलिम्पिकची तयारी लक्षात घेता बुधवारी सादर करण्यात आलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात ३,३९७.३२ कोटी रुपयांची मोठी तरतूद करण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या वेळी ७२३.९७ कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

गेल्या वर्षी क्रीडा क्षेत्रासाठी ३,०६२.६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. पण प्रत्यक्षात क्रीडा क्षेत्राच्या वाट्याला २,६७३.३५ कोटी रुपये मिळाले होते. करोना संकटामुळे चीनमध्ये हांगझो येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धा या पुढे ढकलण्यात आल्यामुळे गेल्या वर्षी अर्थसंकल्पीय तरतुदीत सुधारणा करताना कपात करण्यात आली. आशियाई स्पर्धा या वर्षी होणार असल्यामुळे या वेळी अर्थसंकल्पीय तरतुदीत वाढ करण्यात आली.

क्रीडा क्षेत्रासाठी तरतूद करताना सरकारने पुन्हा एकदा आपल्या खेलो इंडिया या क्रीडा विकास राष्ट्रीय कार्यक्रमाला प्राथमिकता दिली आहे. खेलो इंडियासाठी असलेली तरतूद ६०६ कोटी रुपयांवरून १,०४५ इतकी वाढवण्यात आली आहे. ही वाढ ४३९ कोटी रुपये इतकी आहे. देशासाठी ऑलिम्पिक, आशियाई, राष्ट्रकुलसारख्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी दर्जेदार खेळाडू तयार करण्याची क्षमता या कार्यक्रमात असल्यामुळेच ही वाढ करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

भारतातील राष्ट्रीय क्रीडा शिबीर, साहित्य उपलब्धता, प्रशिक्षकांची नियुक्ती आणि पायाभूत सुविधा भक्कम करण्यासाठी भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साई) अनुदानातही ३६.०९ कोटी रुपये वाढ करण्यात आली आहे. या सगळ्यांसाठी क्रीडा प्राधिकरणाला या वर्षी ७८५.५२ कोटी रुपये मिळतील. अर्थसंकल्पात राष्ट्रीय क्रीडा संघटनांना दुर्लक्षित केले जात होते. या वेळी मात्र राष्ट्रीय क्रीडा महासंघाच्या अनुदानात ४५ कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे आता ३२५ कोटी रुपये मिळतील. त्याचबरोबर जागतिक उत्तेजक प्रतिबंधक संस्थेशी (वाडा) संलग्न काम करणाऱ्या राष्ट्रीय उत्तेजक प्रतिबंधक संस्था (नाडा) आणि राष्ट्रीय उत्तेजक प्रयोगशाळांना थेट अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.




**MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD**
Kalpataru Point, 2nd, 3rd & 4th Floor, Opp. Cine Planet Cinema, Near Sion Circle, Sion (E), Mumbai - 400 022, Ph: 022-2401 4701 / 2402 4068
Email: jdair@mpcb.gov.in; Website: www.mpcb.gov.in

**RFP NOTICE No.: MPCB / JD(APC) /Exhibition – 01 /2023**

Maharashtra Pollution Control Board invites RFP from the Agencies having valid registrations from RoC/RoF/Proprietary with necessary infrastructure, manpower & experience in the field of Carbon Neutrality, Scientific Exhibition and Conference for **"Selection of Agency for providing Carbon Neutral Exhibition Stall inculcating Five Elements of Nature to represent Environment and Climate Change Department, Govt. of Maharashtra / MPC Board efforts integrating Panchmahabhuta to be held from 20/02/2023 to 26/02/2023 at Shri Siddhgiri Mahasansthan, Kanheri Math, Kolhapur".**

Complete RFP document for the above e-Tender can be purchased between **3rd Feb., 2023 to 9th Feb.,2023 up to 1100 Hrs** by making an online payment of Rs.5,000/- (Rs. Five Thousand only) towards RFP document fee from following sub-portal on GOM e-Tendering website: **www.mahatenders.gov.in**

The RFP document can also be downloaded from MPCB's official website **www.mpcb.gov.in.** • **EMD: Rs.5,00,000/-** (Rs. Five Lakh Only)

• **Last date of Bid Submission** : 9th Feb. 2023 up to 1100 Hrs.

**OTHER KEY DETAILS:** • Pre-bid meeting date: **06.02.2023 at 1300 hours** at above Office address. • Time and Date of Opening Bid at **09.02.2023 at 1400 hrs.**

Sd/-
(Member Secretary)
Maharashtra Pollution Control Board

# GFL LIMITED

Registered office: 7th Floor, Ceejay House, Dr. Annie Besant Road, Worli, Mumbai – 400 018
CIN: L65100MH1987PLC374824 • Tel. No.: +91- 22 4032 3851 • Fax No.: +91- 22 4032 3191
Website: www.gfllimited.co.in • Email ID: contact@gfllimited.co.in

**EXTRACT OF UNAUDITED CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED AND NINE MONTHS ENDED 31 DECEMBER 2022**

(Rs. in Lakhs)

| Sr. No. | Particulars | Quarter ended 31-12-2022 (Unaudited) | Nine Months ended 31-12-2022 (Unaudited) | Quarter ended 31-12-2021 (Unaudited) |
|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from operations | 51,639 | 1,47,436 | 29,703 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period before tax (Before exceptional Items) | 2,755 | 5,121 | (86) |
| 3 | Net Profit/(Loss) for the period before tax (After exceptional Items) | 317 | 2,683 | (16) |
| 4 | Net Loss for the period after tax (After exceptional Items) | (4,160) | (2,440) | (25) |
| 5 | Total Comprehensive Income for the period (Comprising Loss for the period after tax and Other Comprehensive Income after tax) | (4,159) | (2,452) | (4) |
| 6 | Paid-up equity share capital (face value Rs. 1 per share) | 1,099 | 1,099 | 1,099 |
| 7 | Other Equity (excluding revaluation reserves) | | | |
| 8 | Basic and Diluted Earnings/(Loss) per share (face value of ₹1/- each) | | | |
| | a) Basic (₹) | (3.79)* | (2.22)* | (0.02)* |
| | b) Diluted (₹) | (3.79)* | (2.22)* | (0.02)* |

*not annualized

**Notes:**

1. The above results were reviewed by the Audit Committee and were thereafter approved by the Board of Directors at its meeting held on 1 February 2023. The Statutory Auditors of the Company have carried out the Limited review of the above results and have issued their unmodified review report.
2. The above results are an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the stock exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the unaudited Quarterly standalone and consolidated Financial Results are available on the Stock Exchanges' website (www.bseindia.com and www.nseindia.com) and on the Company's website (www.gfllimited.co.in).
3. Information on Standalone Financial Results:

(Rs. in Lakhs)

| Sr. No. | Particulars | Quarter ended 31-12-2022 (Unaudited) | Nine Months ended 31-12-2022 (Unaudited) | Quarter ended 31-12-2021 (Unaudited) |
|---|---|---|---|---|
| 1 | Total income from operations | 84 | 242 | 56 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period before tax (After exceptional Items) | 9 | 77 | 133 |
| 3 | Net Profit/(Loss) for the Period after tax (After exceptional Items) | 1 | 49 | 98 |

On behalf of the Board of Directors
For GFL Limited

Place : Mumbai
Date : 1 February 2023

Siddharth Jain
Director

IHCL

# दि इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : मांडलिक हाऊस, मांडलिक रोड, मुंबई ४०० ००१
सीआयएन : एल७४९९९एमएच१९०२पीएलसी०००१८३, इमेल : investorrelations@ihcltata.com, संकेतस्थळ : www.ihcltata.com

**३१ डिसेंबर, २०२२ रोजी संपलेली तिमाही आणि नऊमाहीकरिता स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा गोषवारा**

₹ लाखांत

| तपशील | स्वतंत्र | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | संपलेली तिमाही ३१.१२.२०२२ (पुर्नविलोकित) | संपलेली तिमाही ३१.१२.२०२१ (पुर्नविलोकित) | संपलेले नऊ महिने ३१.१२.२०२२ (पुर्नविलोकित) | संपलेले नऊ महिने ३१.१२.२०२१ (पुर्नविलोकित) | संपलेले वर्ष ३१.०३.२०२२ (लेखापरिक्षित) |
| प्रवर्तनाकडील एकूण उत्पन्न | १०६१५६ | ७४०८७ | २५७३१२ | १४०९७६ | २००३३४ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (करपूर्व आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ३७६५३ | १४७९६ | ७३४६३ | (११४७१) | २९८२ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ३७६५३ | १४४६५ | ७२९३६ | (१३६३९) | (२७११) |
| कालावधीसाठी करपश्चात निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | २८३१८ | १२४०९ | ५४४०९ | (१२००५) | (३४४५) |
| कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न (कालावधीसाठी (कर पश्चात) अंतर्भूत केलेला नफा /(तोटा) आणि इतर सर्वंकष उत्पन्न (करपश्चात)) | २८५१२ | ७४०१ | ५२४८२ | (१४२६६) | (६९९) |
| भरणा केलेले समन्याय भाग भांडवल (दर्शनी मुल्य प्रती भाग ₹ १/- प्रत्येकी) | १४२०४ | १३२१४ | १४२०४ | १३२१४ | १४२०४ |
| अन्य समभाग | ८४२५७० | ५८५७६४ | ८४२५७० | ५८५७६४ | ७९५७७३ |
| सिक्युरिटीज प्रीमियम | ६६२४८७ | ४६६०४८ | ६६२४८७ | ४६६०४८ | ६६२४९० |
| निव्वळ मुल्य | ८५६७७४ | ५९८९७८ | ८५६७७४ | ५९८९७८ | ८०९९७७ |
| थकित कर्ज | ४४८८४ | १६६५०६ | ४४८८४ | १६६५०६ | ९४२५३ |
| कर्ज इक्विटी गुणोत्तर (इन टाईम्स) | ०.०५ | ०.२८ | ०.०५ | ०.२८ | ०.१२ |
| प्रति भाग कमाई (प्रत्येकी ₹ १ च्या) (चालू असलेल्या व खंडित प्रवर्तनांसाठी) : मूलभुत आणि सौम्यीकृत (₹ मध्ये) (*वार्षिकीकृत न केलेले) : | *१.९९ | *१.०० | *३.८३ | *(०.९७) | (०.२७) |
| भांडवल विमोचन राखीव निधी | ११२ | ११२ | ११२ | ११२ | ११२ |
| डिबेंचर रिडीमशन रिझर्व | - | १०७०४ | - | १०७०४ | ५१८१ |
| ऋण सेवा व्याप्ती गुणोत्तर (इन टाईम्स) | १.०० | ०.२१ | १.०० | ०.२१ | ०.२० |
| व्याज सेवा व्याप्ती गुणोत्तर (इन टाईम्स) | १५.६१ | १.२८ | १५.६१ | १.२८ | २.०१ |

₹ लाखांत

| तपशील | एकत्रित | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | संपलेली तिमाही ३१.१२.२०२२ (पुर्नविलोकित) | संपलेली तिमाही ३१.१२.२०२१ (पुर्नविलोकित) | संपलेले नऊ महिने ३१.१२.२०२२ (पुर्नविलोकित) | संपलेले नऊ महिने ३१.१२.२०२१ (पुर्नविलोकित) | संपलेले वर्ष ३१.०३.२०२२ (लेखापरिक्षित) |
| प्रवर्तनाकडील एकूण उत्पन्न | १६८५८० | १११११२२ | ४१८४४८ | २१८४१४ | ३०५६२२ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (करपूर्व आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ४९४८९ | ११९६९ | ८९१३३ | (३३४५२) | (२७३८०) |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ४९४९९ | १०९४५ | ८९४६४ | (३३५२६) | (२५८१८) |
| कालावधीसाठी करपश्चात निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ४०३५६ | ९५९६ | ७१३९९ | (३३६५४) | (२६४९७) |
| कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न (कालावधीसाठी (कर पश्चात) अंतर्भूत केलेला नफा /(तोटा) आणि इतर सर्वंकष उत्पन्न (करपश्चात)) | ५५०१८ | ६१०२ | ७८९९५ | (३१५२६) | (१५४६९) |
| भरणा केलेले समन्याय भाग भांडवल (दर्शनी मुल्य प्रती भाग ₹ १/- प्रत्येकी) | १४२०४ | १३२१४ | १४२०४ | १३२१४ | १४२०४ |
| अन्य समभाग (नियंत्रित नसलेल्या व्याजासह) | ८२११६० | ५७५९६७ | ८२११६० | ५७५९६७ | ७५१३२२ |
| सिक्युरिटीज प्रीमियम | ६६२४८७ | ४६६०४८ | ६६२४८७ | ४६६०४८ | ६६२४९० |
| निव्वळ मुल्य | ८३५३६४ | ५८९१८१ | ८३५३६४ | ५८९१८१ | ७६५५२६ |
| थकित कर्ज | ७८१४९ | २७२९६७ | ७८१४९ | २७२९६७ | १९८४७६ |
| कर्ज इक्विटी गुणोत्तर (इन टाईम्स) | ०.०९ | ०.४६ | ०.०९ | ०.४६ | ०.२६ |
| प्रति भाग कमाई (प्रत्येकी ₹ १ च्या) (चालू असलेल्या व खंडित प्रवर्तनांसाठी) : मूलभुत आणि सौम्यीकृत (₹ मध्ये) (*वार्षिकीकृत न केलेले) : | *२.६९ | *०.६१ | *४.७५ | *(२.६१) | (१.९७) |
| भांडवल विमोचन राखीव निधी | १०७९ | १०७९ | १०७९ | १०७९ | १०७९ |
| डिबेंचर रिडीमशन रिझर्व | - | १०७०४ | - | १०७०४ | ५१८१ |
| ऋण सेवा व्याप्ती गुणोत्तर (इन टाईम्स) | ०.७९ | ०.१५ | ०.७९ | ०.१५ | ०.१६ |
| व्याज सेवा व्याप्ती गुणोत्तर (इन टाईम्स) | ८.४८ | ०.९३ | ८.४८ | ०.९३ | १.४२ |

**टिपा :**

१ वरील मजकुर सेबी (सूचीकरण दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजकडे फाइल केलेल्या स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा सविस्तर आराखड्याचा उतारा आहे. तिमाही आणि नऊ महिन्यांकरिता स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा संपूर्ण आराखडा www.bseindia.com आणि www.nseindia.com या स्टॉक एक्स्चेंजच्या संकेतस्थळांवर तसेच www.ihcltata.com या कंपनीच्या संकेतस्थळावरसुद्धा उपलब्ध आहे.

२ मंडळाच्या लेखापरीक्षण समितीने वरील निष्कर्षांचे पुर्नविलोकन केले आणि त्यानंतर ३१ जानेवारी, २०२३ रोजी झालेल्या सभेत संचालक मंडळाने ते मंजूर केले. कंपनीच्या सांविधिक लेखापरीक्षकांनी हे निष्कर्ष पुर्नविलोकित केले आहेत.

३ वरील निष्कर्ष कंपनी अधिनियम (इंडियन अकाऊंटिंग स्टँडर्ड) नियम २०१५ च्या अनुसार, कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १३३ च्या अन्वये त्यानुसार जारी केलेल्या संबंधित नियमांबरोबर वाचल्या जातात आणि सामान्यत: भारतात स्वीकारलेल्या इतर लेखांकन तत्त्वांशी अनुसरून आहेत.

मुंबई
३१ जानेवारी, २०२३

**पुनीत छटवाल**
व्यवस्थापकिय संचालक आणि सीईओ
(डीआयएन: ०७६२४६१६)

हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. **लोकसत्ता कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
**महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाउस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. नं. ३८, अ‍ॅडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : सिद्धार्थ खांडेकर*** (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रुपये.